पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ३**
सभावृत्तात

दिनांक :- १५ / ०५ / २०१२ वेळ :- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक - १५ / ०५ / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. यमुनाताई रमणनाना पवार
३) मा. उल्हास शेट्टी
४) मा. प्रशांत शितोळे
५) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
६) मा. लोंढे गणेश नारायण
७) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा. गावडे - सहा. आयुक्त, मा. भंडारे - प्र. उपनगरसचिव, मा. काची - उपशहर अभियंता, मा. ढगे - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्र.५ :- स.नं. १५८ व १६३ चिंचवड मधील एम.आय.डी.सी.च्या ताब्यातील जागेवरील विकास आराखडयातील वापरामधील फेरबदल करणेबाबत - मा.प्रशांत शितोळे मा. उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६ :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कलम २०५ नुसार घोषित केलेल्या रस्त्याचा टी.डी.आर. मिळणेबाबत - मा. उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील बाधीत रस्ते व आरक्षणाचे क्षेत्राचा टी.डी.आर. / एफ.एस.आय. मिळणेबाबत - मा. उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८ :- मौजे पिंपळे निलख येथील स.नं.२८ मधील १२ मी. रुंद रस्ता स.नं.२७ व २८ च्या हद्दीवरुन आखणी करणेस म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत - मा. उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९:- आकुर्डी दळवीनगर येथील आरक्षण क्र. २७५ प्राथमिक शाळाचे प्रयोजन / वापर बदलाबाबत - मा. उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०:- दिनांक ०१/०१/२००० पूर्वी अस्तित्वात आलेल्या झोपडपट्टयांना नागरी सुविधा पुरविणेबाबत - मा. सिमा सावळे मा. नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११:- मौजे सांगवी स.नं. १ व २ मधील आरक्षण क्र.३२९-अ मैलाशुध्दीकरण केंद्राचे आरक्षण रद्द करणेबाबत - मा. नारायण बहिरवाडे मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२:- टी.डी.आर.चे प्रस्ताव अवलोकनार्थ शहरसुधारणा समितीपुढे ठेवणेबाबत - मा.सिमा सावळे मा. नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा. उल्हास शेट्टी                    अनुमोदक : मा. सुरेश म्हेत्रे

बुधवार दिनांक १६/०५/२०१२ रोजी दुपारी १२.०० पर्यत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

---------------

मा.सभापती : बुधवार दिनांक १६/०५/२०१२ रोजी दुपारी १२.०० पर्यत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ३**
सभावृत्तांत
(दिनांक १५/०५/२०१२ ची तहकूब सभा)

दिनांक :- १६ / ०५ / २०१२ वेळ :- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक १५/०५/२०१२ ची तहकूब सभा बुधवार दिनांक - १६ / ०५ / २०१२ रोजी दुपारी १२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. यमुनाताई रमणनाना पवार
३) मा. उल्हास शेट्टी
४) मा. प्रशांत शितोळे
५) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
६) मा. लोंढे गणेश नारायण
७) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा. गावडे - सहा. आयुक्त, मा. भंडारे - प्र. उपनगरसचिव, मा. काची - उपशहर अभियंता, मा. ढगे - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०२ / ०५ / २०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक :- १३ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १६/०५/२०१२
सुचक :- मा. प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा.नारायण बहिरवाडे
संदर्भ :- १) मा. बो-हाडे शरद परशुराम यांचा दि.१९/०७/२०११ चा प्रस्ताव -
२) मा. क प्रभाग समिती सभा दि. ०७/०९/२०११ ठ.क्र. ४२

विषय :- बो-हाडेवाडी येथील प्राधिकरणाचे नियंत्रणातील मनपाचे नियोजन नियंत्रणाखाली यावयाचे क्षेत्राचा झोन निश्चित करणेबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार दिनांक २०।११।२०१२ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १४ विषय क्रमांक :- २

दिनांक :- १६/०५/२०१२

सुचक :- मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ :- १) मा. भोसले हनुमंतराव भिमराव यांचा दि.०३/०८/२०११ चा प्रस्ताव -

२) मा. क प्रभाग समिती सभा दि. ०७/०९/२०११ ठ.क्र. ४७

सिटी सर्व्हे नं.५०३५ जागामालक गुडसे सिटी सर्व्हे नं.५०३६ रियाज जहागीर पिरजादे सिटी सर्व्हे नं.५०३७ रियाज जहागीर पिरजादे, सिटी सर्व्हे नं. ५०३३ मैनुद्दीन पिरजादे या सर्व जागामालकांकडून त्यांना समजून सांगून त्यांच्याकडे सात मीटर रस्त्याकरीता विनंती करुन खडीमुरुमाचा रस्ता केलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम २०५ प्रमाणे झालेल्या रस्त्याला मान्यता देऊन मनपाच्या नियमाप्रमाणेवरील सर्व जागामालकांना टी.डी.आर.चा मोबदला मिळावा तसेच सदरचा रस्ता डी.पी.प्लॅनमध्ये नागरिकाच्या घरावरुन जात असून त्या नागरिकांचे घरे वाचवण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७ आधार घेऊन सदरचा रस्ता बदल करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १५ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- १६/०५/२०१२

सुचक :- मा. प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा.उल्हास शेट्टी

संदर्भ :- मा. रामआधार धारिया मा. गोपाळ कुटे यांचा प्रस्ताव -

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील रेड लाईन व ब्लू लाईनमध्ये होत असलेल्या बांधकामांबाबत धोरण ठरविणे.

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १६ विषय क्रमांक :- ४

दिनांक :- १६/०५/२०१२

सुचक :- मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा.उल्हास शेट्टी

संदर्भ :- १) मा. माई ढोरे यांचा दिनांक ०२/१२/२०११ रोजीचा प्रस्ताव -

२) मा. ड प्रभाग समिती सभा दि. ०२/१२/२०११, ठ.क्र. ५०

विषय :- मौजे सांगवी येथील सर्व्हे नं. ९ व ८४ च्या पुर्व टोकाला गावठाणालगत असणारे चौकाचे आरक्षण दुरुस्त करणेबाबत.

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक :- १७ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- १६/०५/२०१२
सुचक :- मा. प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा. उल्हास शेट्टी
संदर्भ :- मा. प्रशांत शितोळे मा.उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव -

चिंचवड स.नं. १५८ व १६३ येथील जागा एम.आय.डी.सी.चे पाणीपुरवठा पंपींग स्टेशन / जलशुध्दीकरण केंद्र आहे. सदर केंद्राची जागा वगळता उर्वरित जागा मोठया प्रमाणावर शिल्लक आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्राचे विस्तारिकरण करण्यास वाव दिसून येत नाही. मौजे चिंचवड येथील स.नं. १५८ व १६३ पैकी एम.आय.डी.सी.च्या ताब्यातील जागा म.न.पा.उपयोगासाठी ताब्यात घ्यावी मनपा उपयोग अंतर्गत येणारी आरक्षणे उदा. १) प्रायेगिक व हौशी तसेच बालनाटय रंगभूमीसाठी सांस्कृतीक हॉल, २) महात्मा गांधी विचार धारा प्रस्तारचे दृष्टीने शिल्प व उद्यान, ३) महात्मा गांधी , विनोबा भावे, रविंद्रनाथ टागोर, साने गुरुजी, संत वाड्.मय, शाहू फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विषयी पुस्तक ग्रंथालय.

सबब सदर उर्वरित जागेच्या विकास आराखडयामधील वापरात बदल करुन या जागेवर वरील पैकी कोणतेही असे आरक्षण ठेवून सदर जागा महानगरपालिकेने संपादित करणेस व यासाठी एम.आर.टी. पी. ॲक्ट कलम ३७ अन्वये किरकोळ फेरबदल करणेस ( तसेच सर्व्हे नं. १९२ मधील आरक्षण शाळा व सर्व्हे नं.१९३ मधील आरक्षण प्रसुतीगृह व दवाखाना सदरील आरक्षण कायम ठेवावे.) मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १८ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- १६/०५/२०१२
सुचक :- मा. उल्हास शेट्टी अनुमोदक :- मा. प्रशांत शितोळे
संदर्भ :- मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विकास योजने व्यतिरिक्त कलम २०५ नुसार घोषित केलेल्या सध्या बाधीत मिळकत धारकांना एफ.एस.आय. देणेत येतो. परंतु सदर बाधीत मिळकत धारकांना सदर जागेचा टी.डी.आर. देण्यात यावा. सदर बाधीत जागेचा फक्त एफ.एस.आय. न देता टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देणेत यावा यास कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १९ विषय क्रमांक :- ७

दिनांक :- १६/०५/२०१२

सुचक :- मा. उल्हास शेट्टी अनुमोदक :- मा. प्रशांत शितोळे

संदर्भ :- मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने रस्ता व आरक्षणे ताब्यात घेऊन खाजगी जागामालकांच्या मिळकतीवर विकास कामे केली आहेत. सदर जागांचे रितसर भूसंपादन करण्यात आलेले आहे व अवॉर्ड सुध्दा जाहीर झालेले आहे. परंतु ज्या जागामालकांनी त्याचा मोबदला भूसंपादनाने घेतलेला नाही अशा सर्व बाधीत मिळकतींना टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देणेत यावा. यास कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा. महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २० विषय क्रमांक :- ८

दिनांक :- १६/०५/२०१२

सुचक :- मा. उल्हास शेट्टी अनुमोदक :- मा. प्रशांत शितोळे

संदर्भ :- मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

मौजे पिंपळेनिलख येथे स.नं. २८ मध्ये १२ मीटर रुंद रस्ता विकास योजनेमध्ये मंजूर आहे. सदर रस्ता आरक्षण क्र.३८८ व ३८९ शॉपिंग सेंटर पासून वाकड २४ मी. रुंद रस्त्यापर्यंत आहे. स. नं. २८ मध्ये पिंपळे निलख गावाकडे जाणारा २४ मी. रुंद रस्त्याला मिळणा-या रस्त्याचा चौक आहे. वरील १२ मी. रुंद रस्त्याची आखणी स.नं. २७ व २८ च्या हद्दी लगत परंतु संपूर्ण रस्ता रुंदी स.नं. २८ मधून घेऊन सदरचा रस्ता आरक्षण क्र. ३८८ पासून २४ मी. रस्त्याचे चौका पर्यंत अशी आखणी केल्यास वाकड कडे जाणा-या २४ मी. रुंद रस्त्यास दोन वेगवेगळे जंक्शन न होता सध्या असलेल्या चौकामध्ये येऊन मिळेल व त्यामुळे होणारा वाहतूकीचा अडथळा कमी होईल. कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २१ विषय क्रमांक :- ९

दिनांक :- १६/०५/२०१२

सुचक :- मा. उल्हास शेट्टी अनुमोदक :- मा. प्रशांत शितोळे

संदर्भ :- मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -

चिंचवड आरक्षण क्र. २७५ प्राथमिक शाळा प्रयोजनार्थ आरक्षित जमीन टी.डी.आर.च्या बदल्यात महापालिकेच्या ताब्यात आलेली आहे. या परिसरात आवश्यकतेपेक्षा जास्त शाळेची आरक्षणे आहेत. सबब या आरक्षणाचे प्रयोजनात बदल करुन सदर जागेचा वापर सांस्कृतिक भवन व उद्यान या प्रयोजनार्थ करणेकामी विकास योजनेत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ च्या अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस व उक्त जमीन मनपाचे ताब्यात असल्याने शासनाचे उमेद मान्यतेवर सदर जागेचा वापर उक्त प्रयोजनार्थ सुरु करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस

करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २२ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- १६/०५/२०१२
सुचक :- मा. सिमा सावळे अनुमोदक :- मा. नारायण बहिरवाडे
संदर्भ :- मा. सिमा सावळे मा. नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील १/१/२००० पूर्वी अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टया जरी एम.आय.डी.सी., पी.सी.एन.टी.डी.ए किंवा महानगरपालिका यांचे जागेवर असल्या तरी, अशा झोपडपट्टया मधून महानगरपालिकेमार्फत नागरी सुविधा पुरविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २३ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- १६/०५/२०१२
सुचक :- मा. नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा. उल्हास शेट्टी
संदर्भ :- मा. नारायण बहिरवाडे , मा. उल्हास शेट्टी यांचा प्रस्ताव -

मा.महापालिका सभा ठराव क्र.५३५ दि.२०/१०/२००८ नुसार मौजे सांगवी स.नं.१ व २ मधील आरक्षण क्र.३२९ अ मैलाशुध्दीकरण केंद्राबाबत ठराव मंजूर करणेत आला होता.सदर ठरावात मैलाशुध्दीकरण केंद्राबाबत चार पर्याय देणेत आले होते.सदर प्रकल्प दापोडी येथे महानगरपालिकेने जागा ताब्यात घेऊन बांधकाम चालू केलेले आहे त्यामूळे सांगवी येथील आरक्षीत जागेची आवश्यकता राहीलेली नाही. तसेच सदर मैलाशुध्दीकरण केंद्राचे काही जागेवर नागरीकांनी घरे बांधलेली आहेत त्यामूळे सदरचा मा.महापालिका सभा ठराव क्र.५३५ दि. २०/१०/२००८ रद्द करुन त्या ऐवजी सदरचे मैलाशुध्दीकरण केंद्राचे आरक्षण पूर्णपणे रद्द करुन त्याचा समावेश निवासी विभागात करणेची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- २४ विषय क्रमांक :- १२

दिनांक :- १६/०५/२०१२

सुचक :- मा. सिमा सावळे अनुमोदक :- मा. नारायण बहिरवाडे

संदर्भ :- मा. सिमा सावळे मा. नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव -

महापालिका विकास योजनेनुसार आरक्षणे व रस्ते यांचे जागा मालकांनी टिडीआरची मागणी केली असता टिडीआर महापालिकेकडून दिला जातो. सदर प्रकरणी टिडीआर समितीचे सभावृत्तांत शहर सुधारणा समितीपुढे मान्यतेसाठी व अवलोकनार्थ ठेवण्यात यावेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि /८२४ / २०१२
दिनांक :- २४ / ०५/ २०१२

प्र. उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत :- सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\Nagersachiv4\nnn\Nagersachiv1/shsu-11-12\proceeding3doc.